# महात्मा फुले शिक्षण संस्थेचे,
# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण-इस्लामपूर
## राज्यशास्त्र विभाग
## शिरोळ नगरपालिका अभ्यास भेट
## अहवाल

बी. ए. भाग तीन राज्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांची अभ्यास भेट गुरुवार, दि. २३ फेब्रुवारी २०२३ रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ येथील नगरपालिकेत आयोजित करण्यात आली होती. यावेळी शिरोळ नगरपालिकेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष मा. श्री. अमरसिंह माने पाटील, उपनगराध्यक्ष श्रीमती जयश्री धर्माधिकारी मुख्याधिकारी मा. अभिजित हराळे आणि जिल्हा समन्वयक मा. तैमुर मुलाणी उपस्थित होते. त्यांनी नगरपालिकेची रचना, अधिकार आणि कार्ये यांची विस्ताराने माहिती दिली. नगरपालिकेचे दैनंदिन कामकाज सुरळीतपणे चालविण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या अनेक समित्या, त्यांची रचना, अधिकार आणि कार्ये यांची माहिती दिली. नगरपालिकेतील सदस्य संख्या, त्यांचे प्रभागनिहाय आरक्षण याविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. २०१८ साली स्थापन झालेल्या या नगरपालिकेपुढील प्रमुख समस्या कोणत्या आणि त्यांचे निराकरण करण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या जात आहेत याची त्यांनी विस्ताराने चर्चा केली. नगरपालिकेची उत्पादनाची साधने कोणती आहेत आणि त्यात वाढ करण्यासाठी कोणते मार्ग अनुसरले जात आहेत याविषयी त्यांनी सांगितले. शहरातील स्त्री-पुरुष प्रमाण, आरोग्यविषयक योजना, कुपोषण, सार्वजनिक स्वच्छतागृह यांची त्यांनी माहिती दिली. तसेच नगरपालिकेतील संख्याबळ त्यातून होणारे संघर्ष, नगराध्यक्ष आणि मुख्याधिकारी संबंध याविषयी तसेच विद्यार्थ्यांनी विचारलेल्या अनेक प्रश्नांची त्यांनी विस्ताराने व समर्पक उत्तरे दिली. चर्चेच्या अखेरीस 'माझी वसुंधरा स्वच्छ सर्वेक्षण' अंतर्गत सर्व विद्यार्थी आणि उपस्थितांना शपथ देण्यात आली.

हा संवाद जवळजवळ एक तास चालला होता. या अभ्यास भेटीत एकूण १६ विद्यार्थ्यांनी आणि डॉ. अंगद पाटील यांनी सहभाग घेतला होता. शेवटी कॉलेज आणि विद्यार्थ्यांच्या वतीने वैष्णवी पाटील या विद्यार्थिनीने कॉलेज आणि राज्यशास्त्र विभागाच्या वतीने आभार व्यक्त केले.




नगरपरिषद





